# १५. होळी आली होळी

- **ऐका. म्हणा. वाचा.**

होळी आली होळी
खावी पुरणाची पोळी,
झाडे, फांद्या तोडू नका
केर-कचरा खड्‌ड्यात टाका.

होळी आली होळी
भरा सद्‌गुणांची झोळी,
अनिष्ट रूढी, प्रथांची
बांधू होळीसाठी मोळी.

होळी आली होळी
ठेवू पर्यावरणाचे भान,
नका तोडू वृक्ष राजी
घ्यावी आज अशी आण.





होळी आली होळी
पळून गेली दूर थंडी,
ऊन आता लागलंय वाढू
काढा कपाटातून बंडी.

होळीचा हा सण असा
जो कोणी साजरा करील,
निसर्गराजा त्याच्या घरी
स्वत: येऊन पाणी भरील.

–दिलीप पाटील

**शब्दार्थ :** **अनिष्ट** – वाईट. **बंडी** – एक प्रकारचे वस्त्र. **आण** – शपथ. **पाणी भरणे** – मदत करणे.

## स्वाध्याय



**प्र. १. एक–दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) होळीला करायचा गोड पदार्थ–

(आ) केरकचरा टाकायचे ठिकाण–

**प्र. २. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवीने काय तोडण्यास मनाई केली आहे?

(आ) होळीच्या वेळी झोळी कशाने भरावी?

(इ) होळीसाठी मोळी कशाची बांधावी?

(ई) कवीने होळीच्या दिवशी कोणती शपथ घ्यायला सांगितली आहे?

(उ) कवीच्या मताप्रमाणे होळी साजरी केल्यास त्याच्या घरी कोण पाणी भरेल?

**प्र. ३. 'पर्यावरणाचे भान ठेवून होळी साजरी करा.' याबाबत तुमचे मत दोन–तीन वाक्यांत लिहा.**

**प्र. ४. 'होळी'च्या सणाची तयारी तुम्ही कशी कराल ते लिहा.**

**प्र. ५. तुमच्या परिसरात 'आदर्श होळी' साजरी करण्यासाठी एक सूचनाफलक तयार करा.**

**सूचनाफलक**


झाडे तोडू नका.

______________________

______________________

______________________

**प्र. ६. होळी हा सण 'फाल्गुन' या मराठी महिन्यात येतो. त्याप्रमाणे खालील तक्ता दिनदर्शिका पाहून पूर्ण करा.**




- **खालील सूचना वाचा. अशा आणखी सूचना तयार करा.**

